**-: प्रेसनोट :-** दिनांक : १३/१०/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ४२/२०२१ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | अमित शामभारती गोसावी, वय ४३ वर्षे<br>धंदा - नोकरी, पोलिस नाईक क्रमांक ०६००४० ( नेमणुक - एम.आय.डि.सी. पोलीस ठाणे, अंधेरी (पुर्व) मुंबई ४०० ०९३ ) राठी:- बिल्डिंग नं.०१, रूम नं. ७०७, सहयोग को.ऑप.हौ. सोसा. महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पुर्व), ९३. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | प्रति महिना रु.५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रू.१,५००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे राजश्री सुपर लॉटरीचे दुकान, जिजामाता रोड, पांडे चाळ, पंपाहाऊस, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००९३ या ठिकाणी होते. परंतु लॉकडाऊनमुळे सदरचे दुकान हे गेली दिड वर्षापासुन बंद होते.<br><br>लॉकडाऊन शिथील केल्यानंतर तक्रारदार हे सदरचे दुकान पुन्हा चालु करणार होते. सदरबाबत यातील आलोसे श्री. अमित शामभारती गोसावी , पो.ना.क्र. ०६००४०/ नेमणूक एम.आय.डि.सी. पोलीस ठाणे, अंधेरी (पुर्व), मुंबई-९३ यांना माहिती होताच त्यांनी तक्रारदार यांची प्रत्यक्ष भेट घेवून सदर लॉटरीचे दुकान पुन्हा चालु करण्याकरिता प्रतिमहिना आलोसे यांना रूपये ५,०००/- दयावे लागतील असे सांगितले. तक्रारदार यांनी आलोसे यांना घाबरून दिनांक २५/८/२०२१ रोजी ३,५००/- रूपये दिले होते. उर्वरित रक्कम देण्याकरिता ओलेसे यांनी तक्रारदार यांच्याकडे तगादा लावला होता.<br><br>आरोपी लोकसेवक यास लाच देण्याची तक्रारदार यांची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १३/०९/२०२१ रोजी लाप्रवि, मुंबई कार्यालयात लेखी तक्रार दिली. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १३/०९/२०२१ रोजीच्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे राजश्री सुपर लॉटरीचे दुकान पुन्हा चालु करण्यासाठी यातील आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रति महिना ५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>त्यानंतर दिनांक १३/१०/२०२१ रोजी लावण्यात आलेल्या सापळा कारवाईच्या वेळी लोकसेवक अमिल शामभारती गोसावी,पो.ना.क्र. ०६००४०/ यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेची मागणी केलेली दरमहा रक्कम रूपये ५,०००/- पैकी उर्वरित रूपये १,५००/- एवढी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडल्याने त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला . |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भष्ट्राचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**

**संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई- ३०.**
**संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in**
**ईमेल :– 1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन.– www.acbmaharashtra.net**
**टोलफ्री क्र.१०६४**
**दूरध्वनी क्र.०२२-२४९२१२१२,**
**फॅक्स क्र.०२२-२४९२२६१८,**
**व्हॉट्स ॲप क्रमांक-९९३०९९७७००**

सहाय्यक पोलीस आयुक्त
सत्यमेव जयते
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner